# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण

## “ सर्वांसाठी घरे  - २०२२ ”



जुने कच्चेघर...



नविन घरकुल...

# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण

- महाराष्ट्र शासन , ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर २०१६ अन्वये राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण राबविणेबाबत महाराष्ट्र शासनाकडुन निर्देश देण्यात आलेले आहे.

- यापुर्वीच्या कार्यान्वित असलेल्या इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण मध्ये करण्यात आलेले आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण दिनांक १ ऑगस्ट २०१६ पासुन सुरु झाली.

- सामाजिक आर्थिक व जात निहाय –जनगणना (SECC) - २०११ च्या Generated Priority List  मधुन ग्रामसभेच्या निवडीनुसार पात्र ठरलेल्या प्राधान्यक्रम यादी (Permanent Wait List) मध्ये समावेश असलेल्या कच्चेघरधारक / बेघर लाभार्थ्यांना कायमस्वरुपी घरकुलाचा लाभ मिळवून देणे हा  योजनेचा उददेश आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण अंतर्गत प्रति लाभार्थी दिले जाणारे अनुदान व नरेगा कृतीसंगम (Convergen) -

| | | |
|---|---|---|
| घरकुलाकरिता प्रति लाभार्थी दिले जाणारे अनुदान ( एक लक्ष वीस हजार ) | रु. | १,२०,०००/- |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२०३/- x ९० दिवस)(अठरा हजार दोनशे सत्तर ) | रु. | १८,२७०/- |
| एकुण रक्कम | रु. | १,३८,२७० /- |

- ❖ प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण अंतर्गत लाभार्थीस दिले जाणारे अनुदान PFMS (Public Fund Monitoring System) द्वारे थेट लाभार्थ्याच्या खात्यावर जमा करण्यात येते .

- ❖ सदर लाभार्थी निवडीचा अधिकार ग्रामसभेस देण्यात आलेला असून, घरकुल बांधुन पुर्ण झालेनंतर ग्रामपंचायतीमध्ये विहित नोंदवहीत पत्नीच्या किंवा पति पत्नीच्या संयुक्त नांवे घरकुलाच्या नोंदी घेतल्या जातात.

# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण अंतर्गत दिले जाणारे अनुदान ४ हप्ते

2

घरकुलाचे बांधकाम पाया
पर्यंत झाल्यावर दिला जाणारा
दुसरा हप्ता रु. 45000/-

3

घरकुलाचे बांधकाम छता
पर्यंत झाल्यावर दिला जाणारा
तिसरा हप्ता रु. 40000/-

1

घरकुल मंजुरी नंतर लगेच
दिला जाणारा
पहिला हप्ता रु. 15000/-




घरकुलाचे अनुदान
एकुण रक्कम रु. 1,20,000/-
( एक लाख वीस हजार )

4

घरकुलाचे बांधकाम
शौचालयासह पुर्ण झाल्यावर
दिला जाणारा
चौथा (अंतिम) हप्ता
रु. 20000/-

# पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य

- ग्राम विकास विभागाचे दि. ३० डिसेंबर २०१५ व दि. १४ जुलै २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण मधील घरकुल बांधणेस जागा नसलेल्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी ५०० चौ. फुटापर्यंत जागा खरेदी करणेस मान्यता देणेत आली आहे. सदर योजने अंतर्गत प्रति लाभार्थी ५०० चौ. फुट जागा खरेदीकरिता प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रु. ५०,०००/- यापैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देण्यात येते.

- शहराजवळील ग्रामपंचायतींमध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता , ५०० चौ. फुटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+१) किंवा तीन मजली (G+२) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- ग्राम विकास विभागाचे दि. ०२ ऑगस्ट २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार घरकुल बांधकामास जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थींना शासकीय / गायरान जमीन विनामुल्य उपलब्ध करून देणे दृष्टीक्षेपात आलेले आहे.

**दि. १४ जुलै २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार घरकुल बांधकामासाठी जागा नसलेल्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण व अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी तालुकास्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे -**

| | | |
|---|---|---|
| गट विकास अधिकारी | - | अध्यक्ष |
| नायब तहसिलदार | - | सदस्य |
| उप अभियंता  सदस्य | | |
| तालुका निरीक्षक , भूमी अभिलेख | - | निमंत्रक |
| उप निबंधक (नोंदणी) | - | निमंत्रक |
| City Survey Office | - | निमंत्रक |
| सहाय्यक प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी प्रकल्प कार्यालय) | - | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (समाजकल्याण) | - | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (पंचायत) | - | सदस्य सचिव |

# रमाई आवास योजना

Ramai Awas Yojana Maharashtra

## योजनेचे निकष

- लाभार्थ्याची निवड शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर २०१६ अन्वये करण्यात येते.
- लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचीत जाती व नवबौध्द संवर्गातील असावा.
- लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे.
- लाभार्थी हा बेघर असावा किंवा त्यांच्याकडे पक्के घर नसावे.
- लाभार्थी कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रू.१.२० लक्ष राहील.
- लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण – १०११ (SECC 2011) प्राधान्य क्रम यादीच्या (GPL) निकषा बाहेरील असावा.

**दि. ३० सप्टेंबर २०१६ रोजीच्या शासननिर्णयानुसार राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे प त्यांच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणुन ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधुन देण्यासाठी शासनाने ही योजना सुरु केली आहे. ग्रामीण क्षेत्रात निवड केलेल्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची अंतिमत: निवड करण्याकरिता दिनांक १३ फेब्रुवारी २०१९ अन्वये पुढिलप्रमाणे घरकुल निर्माण समिती पुनर्गठित करण्यात आली आहे .**

| | | |
|---|---|---|
| पालकमंत्री (संबंधित जिल्हयाचे ) | - | अध्यक्ष |
| विधानसभा सदस्य संबंधित जिल्हा (अनुसूचित जातीचे) | - | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , संबंधित जिल्हा | - | सदस्य |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता , जिल्हा परिषद (सार्वजनिक बांधकाम विभाग) | - | सदस्य |
| सहाय्यक आयुक्त , समाज कल्याण विभाग | - | सदस्य सचिव |

# शबरी आदिवासी घरकुल योजना

## योजनेचे निकष

* लाभार्थ्याची निवड शासन निर्णय दिनांक १५ मार्च २०१६ अन्वये ग्राम सभेच्या मान्यतेने करण्यात येते.
* लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचीत जमाती या संवर्गातील असावा.
* लाभार्थ्यचि महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे.
* लाभार्थी हा बेघर असावा किंवा त्यांच्याकडे पक्के घर नसावे.
* लाभार्थी कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रू.१.२० लक्ष राहील.
* लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण – १०११ (SECC 2011) प्राधान्य क्रम यादीच्या (GPL) निकषा बाहेरील असावा.

**दि. २८ मार्च २०१३ रोजीच्या शासननिर्णयानुसार अदिवासी उप योजनेंतर्गत अदिवासी क्षेत्रांतर्गत येणा-या जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच अदिवासी बाहय क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. ग्राम सभेने निवड केलेल्या अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची अंतिमत: निवड करण्याकरिता १५ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णया अन्वये पुढिलप्रमाणे घरकुल निर्माण समिती पुनर्गठित करण्यात आली आहे .**

| | | |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , संबंधित जिल्हा | - | अध्यक्ष |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता , ( बांधकाम ) जिल्हा परिषद | - | सदस्य |
| प्रकल्प अधिकारी एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प | - | सदस्य सचिव |

# आदिम अदिवासी आवास योजना

**दि. २७ मे २०१६ , दि. ०६ जानेवारी २०१७ व दि. ०६ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या शासननिर्णयानुसार अदिम जमाती विकास कार्यक्रम खालील मंजुरी केलेली घरकुले शबरी अदिवासी घरकुल योजनेच्या निकषानुसार बांधण्याचा सदर शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. अदिवासी उप योजनेंतर्गत अदिवासी क्षेत्रांतर्गत येणा-या जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच अदिवासी बाहय क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. ग्राम सभेने निवड केलेल्या अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची अंतिमत: निवड करण्याकरिता १५ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णया अन्वये पुढिलप्रमाणे घरकुल निर्माण समिती पुनर्गठित करण्यात आली आहे .**

| | | |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , संबंधित जिल्हा | - | अध्यक्ष |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता , ( बांधकाम ) जिल्हा परिषद | - | सदस्य |
| प्रकल्प अधिकारी एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प | - | सदस्य सचिव |

# अटल कामगार आवास योजना

- उद्योग, उर्जा व कामगार विभाग , महाराष्ट्र शासन यांचे कडील शासन निर्णय इबांका२०१८/प्र.क्र.२०८/कामगार७ दिनांक १४ जानेवारी २०१९ नुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडे ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना अटल बांधकाम कामगार (ग्रामीण) आवास योजनेअंतर्गत लाभ देण्याचे निश्चित केले आहे. पुणे जिल्हयाकरिता ७९५७ एवढे उदिदष्ट प्राप्त असुन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ यांचेकडुन उदिदष्टपुर्तीची कार्यवाही सुरु आहे . सदर उदिदष्टापैकी १ लाभार्थ्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच कामगार आयुक्त स्तरावर ११ प्रस्ताव प्राप्त असुन मंजुरीची प्रक्रिया सुरु आहे.

## लाभार्थी निवडीचे निकष

- बांधकाम कामगार नोंदणीकृत (सक्रीय) असावा अर्ज करताना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडे सलग एक वर्षापेक्षा अधिक, बांधकाम कामगार म्हणुन नोंदणीकृत असावा.
- नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना चे स्वत:च्या/पती/पत्नीच्या नावावर महाराष्ट्र राज्यात पक्के (सिमेंट,वाळुने बांधलेले) घर नसावे.
- नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारास पक्के घर बांधण्यासाठी स्वत:च्या/पती/पत्नीच्या नावे मालकीची जागा असावी अथवा मालकीचे कच्चे घर असलेल्या त्या ठिकाणी घर बांधता येईल.

## जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समिती

अटल बांधकाम कामगार (ग्रामीण) आवास योजनेअंतर्गत केलेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी अपर कामगार आयुक्त/ कामगार उपायुक्त यांचेअध्यक्षतेखाली जिल्हास्तरावरील लाभार्थ्यांची निवड करण्यात येत असुन समितीची रचना खालील प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| १. | अपर कामगार आयुक्त/ कामगार उपायुक्त | अध्यक्ष |
| २. | प्रकल्प संचालक ,जिल्हाग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ३. | जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ | सदस्य |
| ४. | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ | सदस्य सचिव |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

- विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग , महाराष्ट्र शासन यांचे कडील शासन निर्णय ग,नियो-२०१७/प्र.क्र०६०/विजाभज-१ दिनांक २४ जानेवारी २०१८ नुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या समाजास विकासाच्या मुळ प्रवाहात बाणणेसाठी त्यांचे राहणीमान उंचावे, उत्पन्नाचेस्त्रोत वाढावे , स्थिरता प्राप्त व्हावी म्हणून त्यांना जमीन उपलब्धकरुन तेथे वसाहत उभी करणे , त्यांना आर्थकदृष्टया स्वयंपुर्ण बनविणे याकरिता रमाई आवास योजना अथवा प्रमप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर यशवंतराव मुक्त वसाहत योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर प्रस्ताव सादर करणेबाबत सर्व गट विकास अधिकरी यांना निर्देशित करण्यात आले आहे .

## लाभार्थी निवडीचे निकष

- लाभार्थी कुटुंब हे विमुक्त जाती भटक्या जमाती या मूळ प्रवर्गातील तसेच गावोगावी भटकंती करुन उपजिविका करणारे असावे
- लाभार्भ कुटुंबाचे वार्षिक उत्पन् रु. १.२०. पेक्षा कमी असावे.
- लाभार्थी कुटुंबाचे स्वत: च्या मालकीचे घर नसावे
- लाभार्थी कुटुंब बेघर अथवा झोपडी/कच्चेघर/पालामध्ये राहणारा असावा/असावेत.
- लाभार्थी कुटुंब हे भुमीहीन असावे (प्रकल्पग्रस्त व पुनर्वसीत सोडुन ). गावठाणातील लाभार्थींना सामुहिक वसाहत योजनेमध्ये घरकुलाचा लाभ देणेसाठी भुमीहीन असल्याची अट शिथील करण्यात येत आहे. मात्र इतर सामुहिक योजनेमध्ये भुमीहीनची अट कायम राहणार आहे.
- लाभार्थी कुटुंब भुमीहीन असावे (प्रकल्पग्रस्त व पुनर्वसीत सोडुन ) परंतु घर बांधण्यासाठी स्वत:च्या मालकीची जागा असावी.
- लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.
- लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- सदरहु योजनेचा लाभ पात्र कुटुबातील एकाच व्यक्तीसदेण्यात येईल .
- लाभार्थी वर्षभरात ६ महिने एका ठिकाणी वास्तव्यास असावा.

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## लाभ देणेकरिता प्राधान्यक्रम

या योजनेसाठी विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील कुटूंबांना खालील प्रमाणे प्राधान्यक्रम देण्यात येईल

१. पालात राहणारे ( गोवोगावी भटकंती करुन उपजिविका करणारा )
२. घरात कोणही कमावत नाही अशा विधवा , परितक्त्या किंवा अपंग महिला
३. पूरग्रस्त क्षेत्र

## जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समिती

सदरहु योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे जिल्हास्तरीय समिती असेल : -

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | प्रकल्प संचालक ,जिल्हाग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ४. | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | सहाय्यक संचालक, नगर रचना | सदस्य |
| ६. | जिल्हा पशु संवर्धन अधिकारी | सदस्य |
| ७. | व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र | |
| ८. | जिल्हा व्यवस्थापक वसंतराव नाईक वित्त व विकास महामंडळ | सदस्य |
| ९. | जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला विजाभज प्रवर्गासाठी कार्यकरणारा सामाजिक कार्यकर्ता | सदस्य |
| १०. | प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग/प्रादेशिक उपसंचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय किंवा तयांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११. | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण अधिकारी व सहाय्यक संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय - | सदस्य सचिव |

# ग्रामीण गृह निर्माण योजना

# घरकुल यशोगाथा

# प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सन २०१६-१७ व २०१७-१८







लाभार्थी यांची जुनी घरे : - १) सुरेखा सोमनाथ पवार २) कल्पना संतोष चव्हाण ३) विठ्ठल पांडुरंग शिंदे

**ग्रामपंचायत :- सारोळे , तालुका :- भोर**

**लाभार्थी यांची नावे:-**

**१) सुरेखा सोमनाथ पवार**

**२) कल्पना संतोष चव्हाण**

**३) विठ्ठल पांडुरंग शिंदे**

आम्ही सुरेखा सोमनाथ पवार, कल्पना संतोष चव्हाण आणि विठ्ठल पांडुरंग शिंदे रा. सारोळे ता. भोर जि. पुणे येथे राहत होतो. आमचे जुने घर साधे दगड मातीचे होते. आमचे घर पावसाळयात गळत होते. त्यामुळे घरात बसता येत नसे. त्यामुळे आमची घरात राहण्याची अडचण होत होती. नंतर आम्हाला ग्रामसेवक व ग्रामपंचायतीच्या मार्फत प्रपत्र ब मध्ये आमची नावे असल्याचे कळाले. व नंतर २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये आम्हाला घरकुल मंजूर झाले. परंतु आम्हाला घरकुल बांधण्यासाठी पुरेशी जागा नव्हती. तेव्हा ग्रामसेवक व पंचायत समिती भोर यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे आमच्या ५०० चौ. फु. जागेमध्ये तीन मजली घरकुल बांधता येते याची आम्हाला माहिती मिळाली. पंचायत समिती भोर, ग्रामसेवक व ग्रामपंचायत सारोळे यांचे मार्गदर्शन व सहकार्यामुळे आमचे तीन मजली घरकुल बांधून तयार झाले. आम्ही सर्वजन खूप खुश आहोत,आनंदी आहोत.



# लाभार्थी यांच्या तीन मजली घरकुलाचे मा. सुरज मांढरे साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद पुणे यांचे हस्ते उदघाटन





# प्रधान मंत्री आवास योजना – ग्रामीण 2016-17

## तालुका बारामती , ग्राम पंचायत पारवडी , लाभार्थी - फिरोज चांदभाई शेख



जुन घर.....




नविन घरकुल.....

# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण घरकुल यशोगाथा




**लाभार्थी : मोरेश्वर दगडोबा गायकवाड**

**ग्रामपंचायत : आळंदी म्हातोबाची**

**तालुका : हवेली**

**सन : २०१६-१७**

# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण 2016-17

## तालुका : इंदापुर , ग्रामपंचायत : सराफवाडी

## लाभार्थी : संजय अवश्वनाथ सुर्यवंशी





जुने कच्चेघर...

घरकुल...

# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण सन : २०१६-१७

## तालुका : हवेली ,        ग्रामपंचायत :  घोणशेत

## लाभार्थी : बारकु  दगडु  चोरघे



जुने कच्चेघर



नविन घरकुल

# शबरी आदिवासी घरकुल योजना सन २०१६-२०१७

**जुने घर**



**नवीन घर**



**ग्रामपंचायत : येणवे खुर्द** **तालुका : खेड** **लाभार्थीचे नाव : किसन शंकर बांबळे**

मी किसन शंकर बांबळे या आधी मी कौलाच्या व मातीच्या दगडाच्या भिंती मध्ये बांधकाम होते परंतु माझे घर हे पडायला आले होते. माझ्या घराच्या भिंती पडायला झाल्या होत्या. माझी मुले ज्या ठिकाणी झोपतात त्याच ठिकाणी भिंत पडल्यामुळे मी पुर्ण पणे खचून गेलो होता घराचे बांधकाम करायचे होते परंतु माझी घरची परस्थिती गरीब असल्यामुळे मला पैसे नसल्याने घराचे काम पण करता येत नव्हते. मी शेतामध्ये मोलमजुरी करून जगत आहे. माझे घरचा कुणी दुसरे कमवता नसल्यामुळे घरबांधण्यासाठी पैसे पण जमा होत नसे. घरी लहान मुले असल्यामुळे त्यांना सांभाळण्यात सर्व पैसा खर्च होत असे. परंतु नंतर मला शबरी आदिवासी घरकुल योजना शासनाच्या योजनेबाबत माहिती मिळाली व सन 2016-2017 या वर्षात मी या योजनेचा लाभ घेतला. यामध्ये मला ग्रामपंचायत व पंचायत समितीचे सतत मार्गदर्शन मिळत राहिले.शासनाच्या या योजनेमुळे आम्हाला आमचे स्वतःचे घर भेटले,समाजाचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. व माझे सप्न जे होते ते या न पुर्ण होणारे स्वप्न हे पूर्ण झाल्यामुळे मला खूप छान वाटते आहे.

# शबरी योजना सन २०१६-२०१७







मी **वामन जयराम कावळे** या आधी माझे घर झोपडीचे होते. स्वतःची जागा असूनही घर बांधण्यासाठी पैसे नव्हते. माझे घर हे तालुक्याच्या ठिकाणाहून 50 किलो मीटर आहे. त्या ठिकाणी मी राहत आहे. मला घराची चणचण ज्या वेळेस पावसाळा सुरू होतो तेव्हा माझे घर पूर्ण पणे गळायचे आम्हाला झोपायचे म्हणजे वरती कागद टाकायचो आणि मग ते पाणी बंद व्हायचे माझ्या परिवाराचे पावसाळ्यात हिवाळ्यात खूप हाल होत होते.मग मला शासनाच्या शबरी आदिवासी घरकुल योजनेबाबत माहिती मिळाली. मी ग्रामपंचायत कार्यालयात चौकशी करून योग्य कागदपत्रांचीपूर्तता केली व मला घरकुल मंजूर झाले. शासनाचेघरबांधणीसाठी टप्प्या-टप्प्याने पैसे मिळत गेले व माझे घरकुल बांधून पूर्ण झाले.आतापावसाळ्या, हिवाळ्यात येणाऱ्या अडचणी दूर झाल्या. मी शासनाचे आभार मानतेत्यांनी आमच्यासारख्या दुर्बल घटकांसाठी हि योजना सुरु केली.आता माझे स्वतःचे घर आहे.

# पारधी आवास योजना सन २०१६-२०१७







**लाभार्थीचे नाव** : किसन गोरख भोसले
**ग्रामपंचायत** : खुटबाव
**तालुका** : दौंड

मी **किसन गोरख भोसले** या आधी मी पत्र्याच्या शेड मध्ये राहत होतो.घर चांगले नव्हते म्हणून माझे जवळचे नातेवाईक माझ्याकडेराहण्यासाठी येत नव्हते.लाईट नव्हती आम्ही अंधारात राहत होतो त्यामुळे असुरक्षित वाटत होते.नंतर मला शासनाच्या पारधी आवास योजनेबाबत माहिति मिळाली व सन २०१६-२०१७ या वर्षात मी या योजनेचा लाभ घेतला. यामध्ये मला ग्रामपंचायत व पंचायत समितीचे सतत मार्गदर्शन मिळत राहिले.शासनाच्या या योजनेमुळे आम्हाला आमचे स्वतःचे घर भेटले,समाजाचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे.मला खूप छान वाटते आहे.

# पारधी आवास योजना सन २०१६-२०१७

**जुने घर**



**नविन घर**



**लाभार्थीचे नाव** : पोसनाबाई सिगारेट काळे
**ग्रामपंचायत** : पाटस
**तालुका** : दौंड

मी **पोसनाबाई सिगारेट काळे** या आधी माझे घर झोपडीचे होते. स्वतःची जागा असूनही घर बांधण्यासाठी पैसे नव्हते.माझ्या परिवाराचे पावसाळ्यात हिवाळ्यात खूप हाल होत होते.मग मला शासनाच्या पारधी आवास योजनेबाबत माहिती मिळाली. मी ग्रामपंचायत कार्यालयात चौकशी करून योग्य कागदपत्रांचीपूर्तता केली व मला घरकुल मंजूर झाले. शासनाचेघरबांधणीसाठी टप्पा-टप्प्याने पैसे मिळत गेले व माझे घरकुल बांधून पूर्ण झाले.आतापावसाळ्या, हिवाळ्यात येणाऱ्या अडचणी दूर झाल्या. मी शासनाचे आभार मानतेत्यांनी आमच्यासारख्या दुर्बल घटकांसाठी हि योजना सुरु केली.आता माझे स्वतःचे घर आहे.



# धन्यवाद